ऊर्जा बचत कार्यक्रमांतर्गत ऊर्जा परीक्षणासाठी द्यावयाच्या आर्थिक सहाय्यात वाढ करणे व योजनेची व्याप्ती वाढविणे.

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्र.अपाऊ २०१०/प्र.क्र.४७०/ऊर्जा-७
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक : १३ जानेवारी,२०११

वाचा - शासन निर्णय , उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक-अपाऊ-२००७/ प्र.क्र.५९०/ऊर्जा-७, दिनांक ११ सप्टेंबर २००७.

प्रस्तावना -

ऊर्जा संवर्धन ही काळाची गरज ओळखून केंद्र शासनाने " ऊर्जा संवर्धन कायदा, २००१ " हा अधिनियम पारित केला आहे. ऊर्जा संवर्धन कार्यक्रमांतर्गत ऊर्जा बचतीसाठी ऊर्जा परीक्षण करणे अत्यंत महत्वाचे आहे. ऊर्जा लेखा परिक्षण करुन घेण्यासाठी प्रोत्साहन म्हणून उपरोक्त संदर्भांकित दिनांक ११ सप्टेंबर,२००७ च्या शासन निर्णयान्वये आर्थिक सहाय्य देण्याच्या योजनेस मान्यता देण्यात आली आहे. "ऊर्जा बचत" कार्यक्रमांतर्गत औद्योगिक क्षेत्र, शासकीय व निमशासकीय इमारती, स्थानिक स्वराज्य संस्था या घटकांना ऊर्जा परिक्षण करण्यासाठी महाऊर्जातर्फे तांत्रिक तसेच आर्थिक सहाय्य देण्यात येते . ऊर्जा बचतीचे वाढते महत्व लक्षात घेता परीक्षणासाठी द्यावयाचे आर्थिक सहाय्य वाढवून अधिकाधिक घटकांचा सहभाग वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय –

ऊर्जा परीक्षणाव्दारे ऊर्जा बचतीमधील सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने यासाठी देण्यात येणाऱ्या आर्थिक सहाय्यामध्ये या शासन निर्णयान्वये खालील तपशीलवार बाबींसाठी अर्थसहाय्यात वाढ करणे व योजनेची व्याप्ती वाढवून अधिकाधिक घटकांचा समावेश करण्यास मंजुरी देण्यात येत असून, "ऊर्जा बचत " कार्यक्रमांतर्गत ऊर्जा परीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावयाचे अर्थसहाय्य महाऊर्जाने खालील बाबींना अनुसरुनच उपलब्ध करावयाचे आहे.

C:\Documents and Settings\admin\Desktop\c.r.२७०.doc-३- १-१-११.doc
शासन निर्णय क्र.अपाऊ-२०१०[दी][१०००-१-२०११]-१

झपाट्याने होणारे शहरीकरण व मोठ्या वाणिज्यिक इमारतींची वाढणारी संख्या यामुळे ऊर्जेचा वापर देखील वाढत आहे. योजेच्या उपकरणांची वेळोवेळी देखभाल व दुरुस्ती होणे व कार्यक्षमता तपासणे अत्यंत आवश्यक असते. घरगुती क्षेत्र देखील ऊर्जेचा मोठा ग्राहक असून, या क्षेत्रामध्ये २० टक्के ऊर्जा बचतीस वाव आहे. यामध्ये प्रामुख्याने ट्रान्सफॉरमर्स, पंप, लिफ्ट, पथदिप यासाठी मोठ्या प्रमाणावर ऊर्जेचा वापर होतो. घरगुती ऊर्जा बचतीचे विविध उपाय केल्यास त्यापासून सुमारे ४९५ मे. वॅ. एवढी ऊर्जा बचत होणे शक्य आहे. वाणिज्यिक इमारती व घरगुती इमारतीचा देखील या योजनेत समावेश करण्यात येत आहे. तसेच सार्वजनिक पाणीपुरवठ्याच्या योजना व पथदिवे यामधील ऊर्जा बचतीस २० ते ४० टक्के वाव पाहता त्याचाही समावेश योजनेत करण्यात येत आहे.

अ. योजनेची माहिती व परिमाण -

१. उद्योग क्षेत्र, वाणिज्यिक इमारती, शासन अंगीकृत उपक्रम, शासकीय/निमशासकीय इमारती, स्थानिक स्वराज्य संस्था या क्षेत्रामध्ये सुमारे ३० टक्के ऊर्जा बचतीस वाव आहे. ऊर्जा बचतीसाठी ऊर्जा परीक्षण करुन घेणे महत्वाचे आहे. ऊर्जा परीक्षणात सुचविलेल्या विविध उपाययोजनांची अंमलबजावणी केल्यास ऊर्जा बचत होऊन, ऊर्जा देयकावरील खर्च कमी होतो. ऊर्जा देयकात वीज देयकाबरोबर कोळसा, तेल, वायू, इंधन या देयकांचाही समावेश असतो. तसेच ऊर्जा बचत केल्यामुळे हरितगृह वायूंचे उत्सर्जनही कमी होते.

२. सर्व प्रकारच्या उद्योग घटकांमध्ये ऊर्जा परीक्षण करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून उपरोक्त शासन निर्णय दिनांक ११ सप्टेंबर, २००७ अन्वये रु. २५०००/- एवढे अनुदान महाऊर्जामार्फत उपलब्ध करुन देण्याबाबत मान्यता देण्यात आली आहे. परंतु आता सदर ऊर्जा परिक्षणासाठी द्यावयाच्या आर्थिक सहाय्यामध्ये वाढ करण्यात येत असून, ज्या उद्योगांचे वार्षिक ऊर्जा देयक रु.२० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा उद्योगांनी ऊर्जा परीक्षण केल्यास ऊर्जा परीक्षण खर्चाच्या ५० टक्के किंवा रु २०,०००/- पर्यंत (जी रक्कम कमी असेल ती रक्कम) आर्थिक सहाय्य म्हणून देण्यात येईल. ज्या उद्योगांचे वार्षिक ऊर्जा देयक रु. २० लाखापेक्षा जास्त व रु. ५० लाखापेक्षा कमी आहे,

अशा उद्योगांनी ऊर्जा परीक्षण केल्यास ऊर्जा परीक्षण खर्चाच्या ५० टक्के किंवा रु. ३०,०००/- पर्यंत (जी रक्कम कमी असेल ती रक्कम) आर्थिक सहाय्य म्हणून देण्यात येईल. तसेच ज्या उद्योगांचे ऊर्जा देयक रु. ५० लाखापेक्षा जास्त आहे अशा उद्योगांना ऊर्जा परीक्षण खर्चाच्या ५० टक्के किंवा रु. ४०,०००/- पर्यंत (जी रक्कम कमी असेल ती रक्कम) आर्थिक सहाय्य म्हणून देता येईल.

३. राज्यात वाणिज्यिक इमारतीदेखील मोठया प्रमाणावर असून, त्यात ३० टक्क्यांपर्यंत ऊर्जा बचतीस वाव आहे. ज्या वाणिज्यिक इमारतीचे वार्षिक ऊर्जा देयक रु. १ लाखापेक्षा जास्त व रु. ५ लाखापेक्षा कमी आहे, अशा वाणिज्यिक इमारतींनी ऊर्जा परीक्षण करुन घेतल्यास ऊर्जा परीक्षण खर्चाच्या ५० टक्के किंवा रु. २५,०००/- पर्यंत (जी रक्कम कमी असल ती रक्कम) आर्थिक सहाय्य म्हणून देण्यात येईल. तसेच रु.५ लाखावरील वार्षिक ऊर्जा देयक असलेल्या वाणिज्यिक इमारतींना ऊर्जा परीक्षण खर्चाच्या ५० टक्के किंवा रु.३०,०००/- पर्यंत (जी रक्कम कमी असेल ती रक्कम) आर्थिक सहाय्य म्हणून देण्यात येईल.

४. शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था / महामंडळे / शासन अंगीकृत कंपन्या यांनी त्यांच्या इमारतीचे ऊर्जा परीक्षण करण्यासाठी ज्या इमारतीचे वार्षिक ऊर्जा देयक रु. ५ लाखापेक्षा कमी आहे त्यांस ऊर्जा परीक्षण खर्चाच्या ५० टक्के किंवा रु. २५,०००/- पर्यंत (जी रक्कम कमी असेल ती रक्कम) आर्थिक सहाय्य म्हणून देण्यात येईल. ज्या इमारतीचे वार्षिक ऊर्जा देयक रु. ५ लाखाहून अधिक आहे त्यासाठी ऊर्जा परीक्षण खर्चाच्या ५० टक्के किंवा रु. ३५,०००/- पर्यंत (जी रक्कम कमी असेल ती रक्कम) आर्थिक सहाय्य म्हणून देता येईल.

५. ऊर्जा बचतीचे वाढते महत्व व घरगुती क्षेत्रातील वाव पाहता घरगुती क्षेत्राचाही समावेश ऊर्जा बचत कार्यक्रमात करण्यात येत आहे. ज्या घरगुती इमारतीसांठीचे ट्रान्सफॉरमरची क्षमता २० के.व्ही.ए. किंवा त्या पेक्षा जास्त आहे अशा घरगुती इमारती/ सोसायटीमध्ये ऊर्जा परीक्षण केल्यास ऊर्जा परीक्षण खर्चाच्या ५० टक्के किंवा रु २०,०००/- पर्यंत (जी रक्कम कमी असेल ती रक्कम) आर्थिक सहाय्य म्हणून देण्यात येईल.

६. पाणीपुरवठा योजना व सार्वजनिक पथदिव्यांमध्ये असलेल्या ऊर्जा बचतीचा वाव लक्षात घेऊन तांत्रिक तसेच आर्थिक सहाय्य देण्यासाठी शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पाणीपुरवठा योजनांचा तसेच नगरपालिका/ महानगरपालिकांमधील सार्वजनिक पथदिव्यांचा समावेश करण्यात येत आहे. ज्या पाणीपुरवठा योजनांचे वार्षिक ऊर्जा देयक रु.२५ लाख किंवा त्यापेक्षा जास्त असेल अशा योजनांमध्ये ऊर्जा परीक्षण केल्यास ऊर्जा परीक्षण खर्चाच्या ५० टक्के किंवा रु ३५,०००/- पर्यंत (जी रक्कम कमी असेल ती रक्कम) ती आर्थिक सहाय्य म्हणून देण्यात येईल. तसेच ज्या नगरपालिकांचे / महानगरपालिकांचे सार्वजनिक पथदिव्यांचे वार्षिक ऊर्जा देयक रु. ३ लाख किंवा त्यापेक्षा जास्त असेल अशा नगरपालिकांनी / महानगरपालिकांनी त्यांचे पथदिव्यांचे ऊर्जा परीक्षण केल्यास ऊर्जा परीक्षण खर्चाच्या ५० टक्के किंवा रु २०,०००/- पर्यंत (जी रक्कम कमी असेल ती रक्कम)आर्थिक सहाय्य म्हणून देण्यात येईल.

ब. योजनेची अंमलबजावणी-

१. सदर योजनेची अंमलबजावणी महाऊर्जाकडे नोंदणीकृत असलेल्या तज्ञ ऊर्जा परीक्षण संस्थांकडून करण्यात येईल. सदर योजनेचा लाभ प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वानुसार देण्यात येईल.

२. परीक्षणासाठी संस्थांची निवड, आर्थिक तरतूद करण्याची, अनुदानाचे निकष ठरविण्याची,योजना राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना तसेच तांत्रिक बाबी निश्चित करण्याची जबाबदारी महाऊर्जाची राहील.

३. ऊर्जा परीक्षण अहवालातील शिफारशींवर कार्यवाही करण्याबाबत संबंधित संस्था / घटकांकडून हमीपत्र घेण्यात येईल.

४. आर्थिक सहाय्यासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी महाऊर्जाने तयार केलेल्या निकषानुसार करण्यात येईल व संबंधित संस्थेस / घटकास अर्थसहाय्य मंजुरीबाबत महाऊर्जाकडून कळविण्यात येईल.

५. ऊर्जा परीक्षण अहवाल महाऊर्जास प्राप्त झाल्यानंतर त्याची छाननी करुन ऊर्जा परीक्षण करुन घेणाऱ्या घटकास आर्थिक सहाय्य महाऊर्जाकडून वितरित करण्यात येईल.

६. योजनेच्या अंमलबजावणीचा प्रगती अहवाल महाऊर्जा शासनास सादर करील.

क. आर्थिक तरतुद –

सदर योजना सन २०१०-११ पासून राबविण्यासाठी मान्यता देण्यात येत असून, यासाठी होणारा खर्च " २८१०-वीज- अपारंपारिक ऊर्जा साधने " या मुख्य लेखाशिर्षा खाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

(सु. दि. पारधी)
प्रभारी अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग, मुंबई.(पत्राने)
महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), म्हाडा कमर्शियल कॉम्पलेक्स, विठ्ठलनगरसमोर, येरवडा, पुणे-४११ ००६
प्रधान सचिव, मुख्यमंत्र्याचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
सचिव, उपमुख्यमंत्र्यांचे सचिवालय, मंत्रालय,मुंबई.
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई.
अप्पर मुख्य सचिव,(सामान्य प्रशासन विभाग), मंत्रालय,मुंबई.
अप्पर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय,मुंबई.
अप्पर मुख्य सचिव (महसूल),मंत्रालय,मुंबई.
अप्पर मुख्य सचिव(वने),मंत्रालय,मुंबई.
प्रधान सचिव(वित्त), मंत्रालय,मुंबई.
प्रधान सचिव(उद्योग), मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (आदिवासी) मंत्रालय,मुंबई.
प्रधान सचिव (नगरविकास-२), मंत्रालय,मुंबई.
सचिव(ग्राम विकास) मंत्रालय, मुंबई.
सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग),मंत्रालय,मुंबई.
प्रधान सचिव, सहकार, मंत्रालय, मुंबई.
खाजगी सचिव ,मा. मंत्री(अपाऊ), मंत्रालय,मुंबई.
खाजगी सचिव सर्व मा. मंत्री/ मा.राज्यमंत्री, मंत्रालय,मुंबई.
सर्व परवानाधारक कंपन्या.
विकास आयुक्त,(उद्योग) उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई.
मुख्य अभियंता (विद्युत) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रशासकीय इमारत ३ रा मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पूर्व), मुंबई-७१.
व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधार कंपनी मर्यादित, मुंबई-४०० ०५१
व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,मुंबई-४०० ०५१
व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, मुंबई-४०० ०५१
व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित,मुंबई-४०० ०५१
सर्व मंत्रालयीन विभाग.
सर्व सन्माननीय विधानसभा सदस्य /विधान परिषद सदस्य.

सर्व महानगरपालिका/ नगरपालिका / जिल्हा परिषदा.
ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने.
निवड नस्ती (ऊर्जा-७) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
